# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र.
२४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eb@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

महाराष्ट्र

"आपली सेवा आमचे कर्तव्य"


जा.क्र. मप्रनि/आस्था/ब-१८५

दिनांक १३/०२/२०२५

## ** तात्पुरती निवड/ प्रतिक्षायादी - सूचना **

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने इन्स्टिटयुट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन (IBPS) या संस्थेद्वारे सरळसेवा भरतीसाठी दिनांक २७/०९/२०२४ व २८/०९/२०२४ या कालावधीत घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये उमेदवारांना पदनिहाय प्राप्त झालेले गुण मंडळाच्या संकेतस्थळावर दिनांक ३०/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

सदर परीक्षेमध्ये गट- 'ब' व गट- 'क' या संवर्गातील खालील पदांवर उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमानुसार सामायिक व समांतर आरक्षणनिहाय तात्पुरती निवड यादी (प्रतिक्षायादीसह) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या www.mpcb.gov.in/recruitment संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग |
|---|---|
| १ | कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी |
| २ | प्रमुख लेखापाल |
| ३ | विधी सहायक |
| ४ | कनिष्ठ वैज्ञानिक सहायक |
| ५ | वरिष्ठ लिपिक |
| ६ | प्रयोगशाळा सहायक |
| ७ | कनिष्ठ लिपिक/टंकलेखक |

निवडसूचीत निवड झालेल्या व प्रतिक्षायादीतील उमेदवारांनी प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पडताळणीसाठी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित रहावयाचे आहे. जे उमेदवार प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणीसाठी उपस्थित राहणार नाहीत, त्या उमेदवारांना निवडसूचीमधून वगळण्यात येईल. सदर पडताळणीसाठी उपस्थित राहण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण निवडसूचीमधील उमेदवारांना त्यांच्या वैयक्तिक ई-मेलद्वारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. तसेच पडताळणीसाठी आणावयाच्या दस्तऐवजांची यादीही त्यासोबतच देण्यात येईल. याबाबत कोणीही मंडळाशी पत्रव्यवहार करु नये अथवा संपर्क साधू नये.

दस्तऐवज पडताळणीनंतर निवडसूचीमधील निवड झालेले उमेदवार विहित कालावधीत रुजू न झाल्यास व त्यांचा रुजू होण्यासाठी विहित केलेला कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्रतिक्षायादीमधील पात्र उमेदवारांचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय/गुणानुक्रमे नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

तसेच वरीलप्रमाणे प्रतिक्षायादीतून निवड झालेले उमेदवार, त्यांना रुजू होण्यासाठी दिलेल्या विहित केलेल्या कालावधीत रुजू न झाल्यास त्यामुळे रिक्त राहिलेली पदे भरण्यासाठी उर्वरित पदनिहाय गुणानुक्रमे पात्र उमेदवारांचा वरीलप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय/ गुणानुक्रमानुसार नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

सदर निवडसूचीतील उमेदवारांच्या नावाची शिफारस प्रमाणपत्र/कागदपत्रे पडताळणी, वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

सदर निवडसूची दिनांक १३/०२/२०२५ पासून पुढील केवळ १ वर्षाच्या कालावधीकरिता म्हणजे दिनांक १२/०२/२०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंतच वैध राहील, याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

गट -'क' मधील 'कनिष्ठ लघुलेखक' पदाकरिता प्राविण्यता चाचणी झाल्यानंतर लेखी परीक्षेत मिळालेले गुण व प्राविण्यता चाचणीचे गुण मिळून सदर पदांची निवडसूची प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. अविनाश ढाकणे, भा.प्र.से.)
सदस्य सचिव